मन चंगा तो कठोती में गंगा !

संपादकीय सल्लागार : मा. पंढरीनाथ पवार

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे ई-मासिक मुखपत्र

# अधिकृत RCM



संत शिरोमणी
रविदास महाराज




मा.श्री.बबनराव (नाना) घोलप
माजी समाजकल्याण मंत्री, महाराष्ट्र

adhikrutrcm@gmail.com ▶ वर्ष : १, अंक : ३, नोव्हेंबर २०२०, पाने : ४ ▶ संपादक : डॉ. शांताराम पां. कारंडे

चमरटा गांठि न जनई।। लोगु गठावै पनही ।।१।। रहाउ
आर नही जिह तोपउ ।। नही रांबी ठाउ रोपउ ।। १।।
लोहु गंठि गंठि खरा बिगूचा ।। हउ बिनु गांठे जाइ पहुचा ।।२।।
रुवदास जपै राम नामा ।। मोही जम सिउ नाही कामा ।।३।। ७।।

*भावार्थ : श्री गुरु रविदासजी महाराज सांगतात की मी कातडी कमावणे शिकलो नाही तरी चांभार असल्यामुळे लोक चप्पला शिवण्यासाठी माझ्याकडे येतात. माझ्याकडे टाके घालण्यासाठी ना सुई आहे ना आरी आहे की ज्याने मी चप्पलांना जोड लावू शकतो. शरिररुपी चप्पलांना शिवून शिवून, वाईट कर्मांना सुधारुन सुधारुन लोक पूर्णतः खराब झाले आहेत. परंतु मी चांगल्या माझ्या चांगल्या कर्मांमुळे माझ्या उद्दीष्टांपार्यंत पोहोचलो आहे. मला खऱ्या रामनामाशिवाय, खऱ्या सेवेशिवाय दुसरे कामच नाही. वाईटाचा विचार करायला माझ्यापासी वेळच नाही. इतकेच काय मला मरणाचा विचार करण्यासाठीही वेळ नाही, व त्याअर्थाने साक्षात यमाशी देखील मला काही काम नाही.*

## चर्मकार समाजाच्या मागण्या घेऊन नाना मुख्यमंत्र्यांच्या भेटीला!



**मुंबई (प्रतिनिधी) :**
माजी समाजकल्याणमंत्री मा.श्री.बबनराव (नाना) घोलप यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची नुकतीच मंत्रालयात भेट घेतली. भेटीदरम्यान उभयतांत विविध विषयांवर चर्चा झाल्याचे समजते. विशेषतः चर्मकार समाजाला मागील ६ ते ८ महिन्यात सोसाव्या लागलेल्या आर्थिक नुकसानाबद्दल बबनराव घोलप यांनी मुख्यमंत्र्यांना सविस्तर माहिती दिली.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व अध्यक्ष, माजी समाज कल्याण मंत्री मा. बबनरावजी(नाना) घोलप यांनी दि. १६ ऑक्टोबर रोजी मान. मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब यांची भेट घेऊन चर्मकार समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. सदर प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी स्वतः जातीने लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आहे.

## नानाच्या वाढदिवशी चर्मकार बांधवांना उद्योगोपयोगी साहित्याची भेट!

राष्ट्रीय चर्मकार महासंघ-मुंबईच्या वतीने नानासाहेबांच्या वाढदिवसानिमित्त चर्मकार साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न





**मुंबई (प्रतिनिधी) :**
राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, क्रांतिकारी नेते, चर्मकार हृदयसम्राट मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय चर्मकार महासंघ-मुंबई जिल्ह्याच्या वतीने विभागीय अध्यक्ष मा. श्री. राजेश खाडे यांनी गरीब गटई चर्मकारांना चर्मकार साहित्य वाटप केले. सदर हत्यारांचे वाटप प्रमुख राष्ट्रीय सल्लागार श्री. पंढरीनाथ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश कार्याध्यक्ष व प्रचार व प्रसार माध्यम मुख्य कॅबिनेट सल्लागार मा. डॉ. शांताराम कारंडे यांच्या शुभहस्ते करून नानांचा वाढदिवस स्वाभिमान दिवस म्हणून साजरा केला. त्यावेळी मुंबई उत्तर मध्य जिल्हाध्यक्ष श्री. सुनील कांबळे, मुंबई युवा अध्यक्ष श्री. जगदीश लाड, तालुकाध्यक्ष श्री. संतोष कांबळे, संदीप लिंगायत व इतर चर्मकार बांधव उपस्थित होते.



## रामदास कांबळे यांची प्रभाग समिती अध्यक्षपदी निवड

मा.श्री बबनरावजी घोलप (नानासाहेब) यांनी मा. नगरसेवक/प्रभाग समिती अध्यक्ष झाल्याबद्दल रामदास कांबळे यांचे अभिनंदन केले व भविष्यातील वाटचालीकरीता आर्शिवाद दिला. सदर प्रसंगी महासंघाचे राष्ट्रीय सचिव उमाकांत डोईफोडे, सवर्श्री जगन्नाथ खाडे, राजू नेटके, सौ. जयश्री खरात, सुरेश काळे, विजय आगवणे, दिपक खरात, विशाल ओगले, शैलेश मराठे, हे पदाधिकारी उपस्थित होते.



## राष्ट्रीय चर्मकार महासंघाकडून घटनेचा जाहिर निषेध!

## दलित तरुणीवर सामुदायिक अत्याचार; तरुणीचा मृत्यू



**जळगाव (वार्ताहर) :**
जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील टोळी गावांतील एका २० वर्षीय दलित मुलीवर गावातील ३ नराधमांनी सामुदायिक बलात्कार करून व या मुलीला विष पाजून तिला पारोळा बस स्टॅन्ड समोर व्हेरी जवळ सोडून दिलं. नातेवाईक मंडळी या मुलीचा शोध घेत असताना ही मुलगी वरील ठिकाणी त्यांना दिसली त्यांनी पारोळा सरकारी दवाखान्यात उपचारासाठी घेऊन गेले तिथल्या डॉक्टरांनी सांगितलं की ती अत्यवस्थ आहे या मुलीला धुळ्याला घेऊन जा. रुग्णवाहिकेतून तिला घेऊन जात असताना त्या मुलीने तिच्या आईजवळ सांगितलं की माझ्यावर सामुदायिक बलात्कार करणारे आपल्याच गावाचे मुलं आहेत, धुळे सिव्हिल हिरे मेडिकल मध्ये उपचार घेत असताना आज पहाटे ३ वाजता तिचा मृत्यू झाला. या प्रकाराचा रा.च.महासंघ तीव्र शब्दात निषेध करत असून मयत भगिनीच्या कुटुंबाला सर्वोतोपरी मदत करणार आहे.

## नवतरुणांना सामाजिक कार्यात सहभागी होण्याचे आवाहन

**नाशिक (प्रतिनिधी) :**
मुंबईतील समस्त चर्मकार बांधवांना या मेसेजद्वारे विनम्र आवाहन करण्यात येत आहे की, जे चर्मकार सध्या मुंबई शहर, पुर्व उपनगर व पश्चिम उपनगरात वास्तव्यास असतील व ज्यांना समाजकार्य करण्याची आवड तसेच इच्छा असेल त्या माझ्या तमाम समाज बंधू-भगिनीं व युवक-युवतींना कळविण्यात येते की, चर्मकार हृदयसम्राट, क्रांतिकारी नेते व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष .मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या सक्षम नेतृत्वाखाली समाजकार्य करण्यास पुढे यावे. नुकतीच मुंबईतील संपूर्ण बॉडी नवनियुक्त बनविण्याची असल्याने बेसीक, महीला, गटई सेल व युवक आघाडीची नवीन कार्यकारिणी गठीत करावयाची आहे.

तरी ज्या समाज बांधवांना सक्षम नेतृत्वाखाली राष्ट्रीय चर्मकार महासंघ या संघटनेत मुंबई मध्ये समाजकार्य करावयाचे आहे, तसेच राष्ट्रीय व महाराष्ट्र राज्य कमिटीत काम करण्याची इच्छा आहे त्यांनी आपली माहिती पुर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबर त्यांनी लवकरात लवकर खालील मोबाईल नंबरचे व्हाट्सएप वर पाठवावे. तसेच जे आपल्या परिचयाचे समाज बांधव आहेत त्यांना पण आपण माहिती द्यावी, तसेच आपल्या समाजातील इतर व्हाट्सएपच्या गृपवर पाठविण्याची कृपा करावी. आपल्या समाजासाठी आपण आपले योगदान देण्याची सविनय विनंती आहे, आपण कोणत्याही राजकीय पक्षात काम करीत असला तरी येथे काम करण्यास हरकत नाही कारण या संघटनेत सर्व पक्षात काम करणारे समाज बांधव समाजासाठी काम करत आहेत याची नोंद घ्यावी.

सदर इच्छुकांनी आपली माहिती दिनांक २५ नोव्हेंबर २०२० पर्यंत पाठवावी, जेणेकरून आपली निवड झाल्यावर आपणास नियुक्ती आदेश माहे डिसेंबर मध्ये भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात येऊन दिले जाईल याची नोंद घ्यावी!

**इच्छूकांनी खालील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा:**
पंढरीनाथ पवार (९८२०२५८०४९)
राष्ट्रीय सल्लागार, राष्ट्रीय चर्मकार महासंघ
सरोजताई बिसुरे (९०८२३४१६२४)
राष्ट्रीय सचिव,
उमाकांत डोईफोडे (९८१९२१३५५३)
राष्ट्रीय सचिव,
डॉ.शांताराम कारंडे (८३२९८१२३४८)
प्रदेश कार्याध्यक्ष,
राजेश खाडे (९८२१६५५५७८)
विभागीय अध्यक्ष मुंबई,

## संपादकिय

# राजकारणाकडून समाजकारणाकडे

**भारताला स्वातंत्र्य मिळून ७३ वर्षे झाली. या कालावधीत चर्मकार समाजाचे अनेक नेते आपण स्वातंत्र्याअगोदर व नंतर देशपातळी पासून ते राज्य पातळी पर्यंत पाहिले आहेत.**

आपण आपल्या महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, बहुतांशी नेते हे समाजकारण करत राजकारणात गेले मोठे झाले मग कोणी नगरसेवक असतील, आमदार असतील, कोणी खासदार झाले असतील ते पुन्हा समाजकारणात आले नाहीत, पण एक नेता राजकारण करता करता मंत्री झाला, आमदार राहीला, पण आपले पुर्ण आयुष्य त्यांनी कायम आपल्या समाजालाच समर्पित केले आहे आणि तो नेता आहे बबनराव घोलप. मंत्री झाल्यावर त्याचा स्वत: उपभोग घेण्याऐवजी त्यांनी चर्मकार समाजालाच नव्हे तर सर्वच दलित, मागासवर्गीय समाजालाच त्याचा उपयोग करून दिला. बबनराव घोलप यांच्या आधीही महाराष्ट्रात अनेक समाज कल्याण मंत्री झाले आणि त्यानंतरही बरेच समाज कल्याण मंत्री झाले पण बबनराव घोलप यांनी जे केले ते कुणीही करू शकले नाही व मला वाटते आता पुढेही होणार नाही. प्रथम समाजातील अनेक संघटना बंद करून समाज संघटीत केला, चर्मकार समाजाचे संघटीत दर्शन मुंबईत शिवाजी पार्क येथे सत्ताधाऱ्यांना घडविले. त्यामुळे राज्याच्या एकूण बजेट पैकी १०% बजेट समाजकल्याण खात्याला मंजूर करून घेतले. समाज कल्याण खात्याचे बजेट वेगळे केले. प्रत्येक जिल्ह्यात सर्व सोयीने युक्त असे मातोश्री वृध्दाश्रम सुरू केल. खास मागासवर्गीय समाजाकरीता आश्रमशाळा सुरू केल्या, मागासवर्गीय समाजाला सहकारी तत्वावर सुत गिरण्या दिल्या.

मागासवर्गीय समाजातील विद्यार्थी यांना वैमानिक शिक्षण घेण्यासाठी आर्थिक तरतुद केली. दलित वस्तीतील रस्ते दुरूस्तीकरीता बजेट मध्ये आर्थिक तरतुद केली,संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ सुरू केले, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महा मंडळाचे प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय सुरू केले,संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे अधिपत्या खाली चर्मोद्योगाला चालना मिळवून दिली, हे सर्व करीत असतांना आपल्या मतदार संघात देखील लक्ष दिले म्हणूनच तर ते त्याच मतदारसंघातून एकदा नव्हे तर पाच वेळा निवडून आले.

आज महाराष्ट्रातून आपल्या समाजाचे ३ खासदार व १३ ते १४ आमदार राखीव जागांवर निवडून आले. महापालिकेपासून ते ग्रामपंचायतींपर्यंत समाजाचे प्रतिनिधी निवडून येतात पण ते आपला मतदारसंघ व आपल्या पक्षाचे काम या व्यतिरिक्त कधीही मागासवर्गीय समाजाचे काम करीत नाहीत. म्हणूनच भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फक्त दहा वर्षांचे राजकीय आरक्षण असावे असे संविधानात नमूद करून ठेवले होते, तरी पण हे राजकारणी व राजकीय पक्षांची धेंडं पुन्हा पुन्हा दहा दहा वर्षांनी संविधानात दुरूस्ती करून राजकीय आरक्षण वाढवून मान डोलावणारे नंदी बैल निवडून आणतात आणि हे गेल्या ७० वर्षांपासून घडत आले आहे. म्हणून हे राजकीय आरक्षण बंद करण्याची मागणी राष्ट्रीय पातळीवर करावी लागेल, असे आता वाटू लागले आहे, तसेच आरक्षणाचा फायदा घेऊन समाजातील नोकरदार वर्ग देखील आपल्या समाजाकडे लक्ष देत नाही, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वच समाजाचा विचार करुन त्यानुसारच अभ्यासपूर्ण संविधान तयार केले आहे आणि त्याबरोबर हेही सांगितले आहे की, संविधानाची योग्य अंमलबजावणी करणारे राज्यकर्ते असतील तरच सर्व समाज सुखी होईल आणि आपला देश उर्वरित जगाला दिशा देईल आणि जर राज्यकर्ते स्वार्थी निघाले तर या सगळ्या समाजाला मदत करायला आकाशातला देव जरी उतरला तरी काहीही फायदा होणार नाही.



■ **पंढरीनाथ पवार**
राष्ट्रीय सल्लागार :
राष्ट्रीय चर्मकार महासंघ
■ 98202 58049

## उपजिल्हाधिकारी पदी बढती,राज्यभरातून अभिनंदन

# महासंघाच्यावतीने भगवत कांबळे यांचा सत्कार

**नाशिक (प्रतिनिधी) :**

अमरावती जिल्ह्यातील धामनगाव रेल्वे तहसिलचे चर्मकार समाजातील, कर्तव्यदक्ष, समाजभुषन तहसिलदार श्री.भगवत पांडूरंग कांबळे यांची उपजिल्हाधिकारी म्हणुन पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा राष्ट्रिय चर्मकार महासंघ अमरावती जिल्हा कार्यकारणीच्यावतीने अमरावती जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री मा.श्री.बबनरावजी घोलप साहेब यांच्या आदेशानुसार, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा राष्ट्रीय प्रवक्ते रविंद्र राजुसकर, प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड, कार्याध्यक्ष डॉ.शांताराम कारडे, प्रदेश सचिव दत्तात्र्य गोतीसे, राज्य उपाध्यक्ष दादासाहेब काटकर, विदर्भ प्रमुख गजानन भटकर, डि आर.माळी सर, शामकुमार आकोडे, राजेंद्र तांबेकर यांच्या मार्गदर्शनानुसार धामणगाव रेल्वे तहसिलचे कर्तव्यदक्ष चर्मकार समाजातील, समाजभुषन तहसीलदार भगवत पांढुरंग कांबळे यांची उपजिल्हाधिकारी म्हणून बढती (पदोन्नती) मिळाल्याबद्दल त्यांचा धामणगाव रेल्वे येथील सर्किट हाऊस येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला.यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन जिल्हा उपाध्यक्ष सत्यनारायण सूर्योदय, धामणगाव बस स्थानक वाहतूक नियंत्रक एस.एस.पाचखंडे, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश तिवारी, तालुका अध्यक्ष मनोहर वाडेकर, तालुका सचिव विलास चंदन, सुरेश खोडे हे होते. तहसिलदार कांबळे यांनी प्रशासकीय सेवेत उल्लेखनिय आदर्श लोकहिताची कामे जलदगतीने चांगली कामे केली.त्यांना चांगल्या कामाबद्दल महसुल विभाग, महाराष्ट्र शासनाच्यावतीने उत्कृष्ट कामाबद्दल प्रशासनाने गौरव केला. कांबळे यांना उपजिल्हाधिकारी म्हणुन बढती मिळाल्याबद्दल जिल्ह्यातच नव्हे तर राज्यभरातुन त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



कांबळे यांची पदोन्नती झाल्याबद्दल भालचंद राठे, शेषरावजी गव्हाळे, सुधाकरजी पानझाडे, सौ.पद्माताई भागवतकर, गजाननराव वानरे, सौ. शोभाताई लोखंडे, रमेशराव गव्हाळे, मोहनराव पटके, दिलीपभाऊ वरजे, जगदेवराव रेवसकर, संजयराव चापके, विजयराव शेकोकार, सतिषराव खंडारे, संजय येवतकर, गणेशराव बुंदिले, अरुणभाऊ गोंडेकर विजय बाबुळकर, देविदासराव किटे, अशोकराव तायडे, पि.बि. वनसकर, भाष्करराव भटकर, अजय तायडे, मनोहर कोथळकर, नंदकिशोर ढाकरे , देवेंद्र पेढेकर, विश्वंभर तायडे, नंदकिशोर जामठे, महेश बोरकुटे, राहुल वाडेकर, गजानन चांदणे, प्रितम भटकर, अजय लोखंडे, किशोर शेकोकार, दिपक मालखेडे, वसंत रेवसकर, विठ्ठल सावळे, अनंत पानझाडे, प्रल्हाद विरुळकर, सचिन वाटकर, अनिल घोरे   नागेश चांदणे , किशोर गव्हाळे , विकास रावळे, मनोज भटकर, विकास रावळे, बंडूभाऊ धामने, अविनाश तायडे, विठ्ठल विजेकर, श्रीकांत नाथे, नागेश डाखोडे, पवन पाचखंडे, सुरज बोरकुटे, सुरज लेवटे, गजानन म.वाडेकर, सौ.उषाताई तायडे, सौ.रत्नाताई मोहकर, सौ.राजकन्याताई मोहकर, अशोकराव मालखेडे, मोतीलाल कठारे, दिलीप तायडे, सारगधर भामोदे, रमेशराव सरोदे, प्रफुल अंबाडकर, बाबुरावचवादे, योगेश मालखेडे, रविंद्र वानखडे आदिनी शुभेच्छा देऊन स्वागत केले आहे.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने इंदापूर तहसीलदार यांना निवेदन

इंदापूर (प्रतिनिधी) :

शासनाच्या वतीने अतितातडीची मागणी इंदापूर तालुक्यातील न्हावी या गावात मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुसकान झाले व दलित वस्तीतील दलित समाजाचे घरे व गृह उपयोगी वस्तू त्या अतिवृष्टी झालेल्या पुरामध्ये वाहून गेल्या त्याची शासनाच्या वतीने त्या कुटुंबांना अति तातडीची मदत शासनानी करावी असे निवेदन राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने सोमवार दिनांक १९/१०/२० रोजी इंदापूर तालुका तहसीलदार सोनाली मेटकरी इंदापूर तालुका गटविकास अधिकारी



परीट साहेब तसेच सभापती ही महेंद्र दादा रेडके या सर्वांशी चर्चा करून तहसीलदार व गट विकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश युवक उपाध्यक्ष माननीय श्री नवनाथ शेवाळे तसेच आमचे सहकारी मित्र राहुल जी मखरे साहेब इंदापूर तालुका अध्यक्ष दत्तात्रय माने कार्याध्यक्ष संजय खरात इंदापूर तालुका युवक कार्याध्यक्ष अमोल भगत इंदापूर तालुका संघटक धनंजय माने उपाध्यक्ष रमेश खरात  सामाजिक कार्यकर्ते बंडू भाऊ शेवाळे गटई कामगार अध्यक्ष गणपत भोसले इंदापूर शहराध्यक्ष सचिन सोनवणे उपाध्यक्ष ऋषिकेश लोकरे या सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थिती निवेदन देण्यात आले.

## संपादक मंडळ

■ **पंढरीनाथ पवार** संपादकीय सल्लागार ■ **डॉ.शांताराम कारंडे** संपादक ■ **जयवंत बामणे** कार्यकारी संपादक

■ **सहसंपादक :** रविंद्र राजुस्कर, दत्तात्रय गोतिसे, रोहीदास बनसोडे, डॉ गणेश बोरकर, मारुती शिवदास

■ **उपसंपादक :** श्रीमती सरोज बिसुरे, पांडुरंग बाविस्कर, ज्ञानेश्वर बसेशंकर,

हे ई–मासिक वृत्तपत्र राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मुद्रक, संपादक डॉ.शांताराम कारंडे यांनी प्रकाशक मे. सिध्दांत प्रकाशनातर्फे २२१/६, गीतगुंजन, सेक्टर–२, चारकोप, कांदिवली (प), मुंबई– ६७ येथून डिजिटली प्रकाशित केले. संपादकीय सल्लागार : पंढरीनाथ पवार email : adhikrutrcm@gmail.com (अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या आणि लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

# चर्मकार समाजासाठी तामलवाडी येथे वधू वर सूचक केंद्र

**अंबड (प्रतिनिधी) :**
तेरणा ग्रामविकास मंडळ उस्मानाबाद व मा.समाज कल्याण मंत्री श्री. बबनरावजी (नाना) घोलप साहेब यांचे मार्गदर्शनानुसार राष्ट्रीय चर्मकार महासंघ संचलित संत रविदास वधु वर सुचक केंद्र तामलवाडी केंद्र संचालक प्रा. जाधव प्रभाकर प्रल्हादराव (पत्रकार) यांच्या प्रयत्नाने सुरू झाले. मराठवाडा भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त व राज्य कार्यकारिणी सदस्य राष्ट्रीय चर्मकार महासंघ महाराष्ट्र राज्य संपूर्ण महाराष्ट्रातील चर्मकार व इतर समाजातील सर्व प्रकारच्या वधु वरांची ऑनलाइन नोंदणी चालू आहे. दर रविवारी सकाळी ९ ते २ वाजे पर्यंत मोफत मार्गदर्शन ! नोंदणीसाठी दोन पोष्टकार्ड साईज व दोन पासपोर्टसाईज फोटो बायोडाटा घेऊन यावे. किंवा पोष्टाने पाठवा संत रविदास समाज प्रकाश किरण वधु-वर परीचय पुस्तीका मिळेल. समाजातील गुणवंत व अनाथ विद्यार्थी दत्तक योजना राबवत आहे. त्या करिता प्रस्ताव पाठवावेत.

# अहमदनगरमध्ये धडाडीच्या नवयुवकांना कार्य करण्याची संधी...



**अहमदनगर (प्रतिनिधी) :**
राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक, राष्ट्रीय अध्यक्ष, माजी समाज कल्याण मंत्री आदरणीय बबनरावजी घोलप यांच्या नेतृत्वाखाली, तसेच प्रदेश उपाध्यक्ष मा. शिवाजीराव साळवे आणि प्रदेश सदस्या शोभाताई कानडे यांच्या सहकार्याने महासंघाचे कार्य अहमदनगर (दक्षिण) जिल्ह्यात चालू आहे. युवकांच्या कार्य-कृतीमधुन समाज विकास साधत असुन, प्रत्येक सामाजिक संघटनांमध्ये युवकांचे महत्त्व वाढत चाललेले आपल्याला दिसून येत आहे, आणि युवकांच्या माध्यमातून सामाजिक कार्याला चांगल्या प्रकारे बळ मिळते म्हणून युवक हा समाजाच्या पाठीचा कणा असल्याचे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष राजेंद्र बुंदेले यांनी केले आहे. रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२० रोजी गुरू रविदासांना अभिवादन करून, राष्ट्रीय चर्मकार महासंघामध्ये युवकांचे संघटन मजबूत करून महासंघाचे कार्य वाढविण्याच्या दृष्टीने, जिल्हाध्यक्ष राजेंद्र बुंदेले यांच्या अध्यक्षतेखाली, शहर जिल्हाध्यक्ष संतोषराव उदमले यांनी जाहीर केलेल्या पदाधिका-यांना जिल्हा कार्याध्यक्ष मा. बाबासाहेब लोहकरे, जिल्हा कोषाध्यक्ष मा. संभाजी आहेर यांच्या हस्ते खालील प्रमाणे नियुक्तयांचे पत्र प्रदान करण्यात आले.

शहरजिल्हा उपाध्यक्ष- प्रशांत धनु डहाके, शहरजिल्हा सह-सचिव- दुर्वेश मंगेश शेलार, या नवीन पदाधिकरींच्या निवडी महासंघाच्या जिल्हा संपर्क कार्यालयात, सॅनिटायजिंग सहित सोशल डिस्टंसिंग पाळत, करण्यात आल्या...

प्रसंगी त्यांना शुभेच्छा देताना...
जिल्हाध्यक्ष राजेंद्र बुंदेले, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब लोहकरे, जिल्हा कोषाध्यक्ष संभाजी आहेर, जिल्हा प्रवक्ते विशाल बेलपवार, युवक सदस्य संतोष त्रिंबके, शहर जिल्हाध्यक्ष संतोष उदमले, शहर जिल्हा उपाध्यक्ष अभिनव सुर्यवंशी, आदी...मान्यवर उपस्थित होते.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघ-उत्तर मुंबईच्या वतीने नानासाहेबांच्या वाढदिवसानिमित्त फळवाटप



**मुंबई (प्रतिनिधी) :**
राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, क्रांतिकारी नेते, चर्मकार हृदयसम्राट मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय चर्मकार महासंघ- उत्तर मुंबई जिल्ह्याच्या वतीने जिल्हाध्यक्ष मा. श्री. दादाभाऊ माने, सचिव श्री. बाबू गोरे यांनी गरीब गटई चर्मकारांना फळे वाटप केले. सदर फळे वाटप कार्यक्रमात मुख्य राष्ट्रीय सल्लागार मा.पंढरीनाथ पवार, प्रदेश कार्याध्यक्ष मा. डॉ. शांताराम कारंडे यांच्या शुभहस्ते केक कापून नानांचा वाढदिवस स्वाभिमान दिवस म्हणून साजरा केला. त्यावेळी मुंबई अध्यक्ष श्री. राजू नेटके, रामदास सातपुते, संदीप लिंगायत, विशंभर माने, दीपक माने, निलेश पोटे, अशोक सौदी, अंकुश पटेकर, संतोष माने, हसन खान, हेदर भाई खान, मच्छीन्द्र माने, श्री. खरात, निलेश पोटे, दत्ता येळके, किरण सातपुते, रवी सातपुते, राजधारी यादव, हेमंत केणी, प्रवीण पाटील, संतोष दामेधार, संतोष धावरे, व इतर चर्मकार बांधव उपस्थित होते.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी उत्तरेश्वर कांबळे यांची निवड



**इंदापूर (प्रतिनिधी) :**
राष्ट्रीय चर्मकार महासंघ इंदापूर शहराच्या वतीने राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे नवनिर्वाचित प्रदेश उपाध्यक्ष माननीय श्री उत्तरेश्वर जी कांबळे साहेब यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना माथाडी कामगार सेनेचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस माननीय श्री दुर्वास दादा शेवाळे तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश युवक उपाध्यक्ष माननीय श्री. नवनाथ शेवाळे राष्ट्रीय चर्मकार महासंघ युवक शहर अध्यक्ष सचिन सोनवणे उपाध्यक्ष ऋषिकेश लोकरे सामाजिक कार्यकर्ते सुहास शेवाळे बंडू लांडगे सचिन शेवाळे रितेश शेवाळे अनिरुद्ध शेवाळे यांच्या सर्वांच्या उपस्थितीत प्रदेश उपाध्यक्ष उत्तरेश्वर कांबळे साहेब यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना भावी सामाजिक व राजकीय वाटचालीस सर्वांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## महासंघाच्या वतीने बेघर, गरीब रुग्णांच्या नातेवाईकांना ब्लँकेट वाटप

### माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रम

**अमरावती (प्रतिनिधी) :**
राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याणमंत्री बबनराव घोलप यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन होत असताना जिल्ह्यात जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्या नेतृत्वात विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन ठिकाणी करण्यात आले.या अंतर्गत ब्लॅंकेट वाटप करण्यात आले.




राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याण मंत्री शिवसेना उपनेते बबनराव घोलप यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत जिल्हा कार्यकारणीच्या वतीने पंचवटी,इर्विन चौक,अमरावती तहसील,शेगाव नाका,कटोरा नाका यासह जिल्ह्यात ठिकठिकाणी सामाजिक उपक्रम म्हणून बेघर आणी गरीब रुग्णांच्या नातेवाईकांना,अपंगांना ब्लॅंकेट सह उपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले. सोबतच बबनराव घोलप यांनी महासंघाच्या स्थापनेपासून तर आजपर्यंत संघटनेच्या वतीने करण्यात आलेल्या विविध समाज उपयोगी कार्याची दखल घेत समाजबांधवांनी कृतज्ञता व्यक्त केली.

अमरावती जिल्हा कार्यकारणीच्या वतीने गटाई कारागीर,बेघर आणी गोर गरीब,रुग्णांचे नातेवाईक तसेच अपंग बांधवांना ब्लॅंकेट सह इतर उपयोगी साहित्याचे वाटप करुन माजी समाज कल्याणमंत्री बबनराव घोलप यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा राष्ट्रीय प्रवक्ते रवींद्र राजुसकर हे होते. जिल्हाध्यक्ष निलेश जामठे,रा.का.सदस्य श्यामकुमार आकोडे,जिल्हा उपाध्यक्ष जगदेव रेवसकर,माजी जि.प.सदस्य विश्वासराव बुरघाटे,शिक्षक आघाडी जिल्हाध्यक्ष गजानन वानरे,गठाईचे जिल्हाध्यक्ष दिलीप वरजे,भातकुली तालुका अध्यक्ष किशोर शेकोकार,युवा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश तायडे,महेश कुरिल,विवेक अतिलकर,सचिन आगलावे सह उपस्थित होते.

## प्रचार व प्रसार विभागीय सल्लागार सदस्य

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व अध्यक्ष मा. श्री. बबनराव ( नाना) घोलप यांच्या आदेशाने आपल्या संघटनेच्या प्रचार व प्रसार विभागाच्या विभागीय सल्लागार सदस्य पदी खालील नियुक्त्या जाहीर करीत आहे. सदर विभागाचे विभागीय कॅबिनेट सल्लागार सदस्य खालीलप्रमाणे असेल.

अमरावती विभाग : गणेश खणसरे (९९२३०३४९९४)
नागपूर विभाग : खुशाल हांडे (९८२२२३५३३०)
औरंगाबाद विभाग : अक्षय वाघमारे (८८८८१९४१०२)

कोकण विभाग : सूर्यकांत कारंडे (८७९३७८९६६०)
ठाणे विभाग : मनोज बनसोडे (९७६७८६६०००)
मुंबई विभाग : जगदीश लाड (९९२०५५४०३९)
पुणे विभाग : सुदाम कांबळे (८२०८९३६१७३)
नाशिक विभाग : दिलीप कानडे (९८२२४७४९२२)

वरील सर्व विभागीय सदस्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे चर्चा करून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामध्ये / तालुक्यात आपापल्या विभागाच्या नियुक्त्या कराव्यात.
सर्व सदस्यांचे पुन्हा अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा !!

■ **डॉ. शांताराम कारंडे**
मुख्य कॅबिनेट सल्लागार - प्रचार व प्रसार माध्यम
राष्ट्रीय चर्मकार महासंघ

# राष्ट्रिय चर्मकार महासंघाच्या धामनगाव (रेल्वे) तालुका अध्यक्षपदी मनोहर वाडेकर तर सचिव पदी विलास चंदन



**धामनगाव (रेल्वे) प्रतिनिधी :**

धामनगाव रेल्वे येथील चर्मकार समाजातील सामाजिक कार्यकर्ते मनोहर वाडेकर यांची राष्ट्रिय चर्मकार महासंघाच्या धामनगाव (रेल्वे) तालुका अध्यक्षपदी तर तालुका सचिव म्हणुन विलास चंदन यांची निवड करण्यात आली आहे. चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याणमंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशाने राष्ट्रिय प्रवक्ते तथा राष्ट्रिय उपाध्यक्ष रविंद्र राजुसकर,प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड,प्रदेश कार्याध्यक्ष डॉ.शांताराम कांरडे,प्रदेश सचिव दत्तात्र्य गोतिसे,विदर्भ प्रमुख गजानन भटकर यांच्या मार्गदर्शनात जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी धामनगाव रेल्वे येथे पार पडलेल्या बैठकीत मनोहर वाडेकर तसेच विलास चंदन यांना नियुक्ती पत्र देवून त्यांचा सन्मान केला.बैठकीच्या अध्यक्षस्थानी धामनगाव रेल्वेचे तहसिलदार,समाजभुषन भगवत कांबळे हे होते.या बैठकीला राष्ट्रिय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे,जिल्हा उपाध्यक्ष सत्यनारायन सुर्योदय,धामनगाव(रेल्वे) बस स्थानकचे वाहतूक नियंत्रक एस.एस.पाचखंडे,शिवसेना तालुकाप्रमुख निलेश तिवारी यांची प्रमुख उपस्थिती होती. येथे नुकताच पार पडलेल्या राष्ट्रिय चर्मकार महासंघाच्या बैठकीमध्ये त्यांच्या निवडीची घोषणा करण्यात आली.जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्या हस्ते मनोहर वाडेकर तसेच विलास चंदन यांचा सत्कार करण्यात आला.वाडेकर यांच्या कडे या अगोदर शहर अध्यक्ष पदाचीच जबाबदारी होती.परंतु आता यांच्या कडे तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

यावेळी समाजभुषन तहसिलदार भगवत कांबळे यांच्या सत्काराच्या दौऱ्यावर असलेले जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी चर्मकार समाज सघटीत होऊन सक्षम झाला पाहीजे,समाजातील नव युवकाच्या माध्यमातुन समाजाला दिशा देण्याची काळाची गरज असुन ज्ञान विज्ञानाच्या सहाय्याने उद्योग केला पाहीजे तसेच चर्मकार समाजातील युवकाच्या न्याय हक्क मिळवुन देण्याकरिता लढा देवून कार्य करणे आवश्यक असल्याचे मत जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी धामनगाव रेल्वे येथे पार पडलेल्या बैठकीमध्ये व्यक्त केले.या नियुक्तीबद्दल मारोतराव गुजरकर,सुरेश खोडे,डिंगाबर कडु,नंदु चव्हाण,राजु अहेरवार,गजानन वाडेकर,संदिप दावेदार यांनी अभिनंदन करुन भावी वाटचालिस शुभेच्छा दिल्या.

# कॅबिनेट सल्लागार समिती सदस्यांचा भव्य सामाजिक सत्कार

**अकोला (प्रतिनिधी):**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ अकोला जिल्हा महानगर मध्ये सर्किट अकोला येथे मोठ्या उत्साहात महाराष्ट्र कॅबिनेट सल्लागार समिती सदस्य मा.प्राचार्य डॉ. श्रीप्रभु चापके सर,मा.सौ.डॉ. मीनाक्षीताई पानझाडे,मा.डॉ. गणेशराव बोरकर सर,मा.गजाननभाऊ भटकर,मा.नरेंद्र चिमणकर सर यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.पांडूरंगजी वाडेकर होते प्रमुख उपस्थित मा.रामभाऊ उंबरकर, मा.प्रकाशभाऊ ठोंबरे जिल्हाध्यक्ष, शिवलालभाऊ इंगळे महानगर अध्यक्ष,मा.निलेश बोरकर युवा अध्यक्ष ग्रामीण,मा.सुमित पानझाडे युवा अध्यक्ष शहर, मा.के.टी.पदमने, मा.रामभाऊ ताजने, मा.नरहरी राजगुरु, मा.छायाताई इंगळे महिला शहर अध्यक्षा, मा.किशोर काकडे तालुका अध्यक्ष,मा.योगेश इंगळे, मा.संतोष इंगळे, मा.छोटु डांगे हे उपस्थित होते.

राष्ट्रीय नेते बबनरावजी घोलप यांनी लावलेल राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे रोपटे त्याला पाणी घालण्याचे काम समाजाचे असुन आहे यापुढे आमच्यावर नाना साहेबांनी टाकलेली जबाबदारी आम्ही समाज संघटनेसाठी व समाजावर अन्याय अत्याचार होऊ देणार नाही असे उदगार मान्यवर सत्कार मुर्ती प्राचार्य डॉ. श्रीप्रभु चापके, गणेशराव बोरकर, सौ.मीनाक्षी पानझाडे, नरेंद्र चिमणकर, पांडूरंगजी वाडेकर, रामभाऊ उंबरकर यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. गणेशराव इंगळे यांचे वाढदिवसानिमीत्त यांना संघटणेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमामध्ये सौ.शांताबाई वाडेकर यांची महिला आघाडीच्या शहरउपाध्यक्षपदी व सतिश इंगळे यांची राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. व समाज बांधव उपस्थित होते.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने डॉ. रोहिदास वाघमारे स्मृती गौरव पुरस्काराचे आयोजन



**मुंबई (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने यंदापासून दिवंगत राष्ट्रीय उपाध्यक्ष कै. डॉ. रोहिदास वाघमारे यांच्या स्मृतींना व कार्यकर्तृत्वाला उजाळा देण्यासाठी महाराष्ट्रातील एकूण ८ विभागीय जिल्ह्यातून निवडक ८ जिल्हाध्यक्षांचा डॉ. रोहिदास वाघमारे स्मृती गौरव पुरस्कार - २०२० देऊन सन्मान करण्यात येणार आहे. सदर पुरस्काराची सुरुवात फेब्रुवारी २०२० पासून सुरू झाली असून प्रथम राज्यस्तरीय मानाचा पुरस्कार राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांना पुणे येथील एका भव्य अशा पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करून करण्यात आली. आता त्याच पुरस्काराचे आदरणीय नानांच्या मार्गदर्शनावरून एकूण ८ पुरस्कारात रुपांतरीत झाले. जे फक्त कार्यतत्पर व कर्तव्यदक्ष जिल्हाध्यक्ष यांना प्रदान करण्यात येईल.

या पुरस्कारांच्या मागील भावना अशी की, आजपासून ते कार्यक्रम संपन्न होईपर्यंत जे जिल्हाध्यक्ष उत्कृष्ट काम करतील त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात येईल. हा पुरस्कार वितरण सोहळा १२ डिसेंबर २०२० ते १२ जानेवारी २०२१ या कालावधीत मुंबई येथे भव्य नाट्यगृहात आयोजित करणार आहोत.

पुरस्कारांची निवड करण्यासाठी आदरणीय नानांच्या अध्यक्षतेखाली सस्पेन्स समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचा निर्णय हा अंतिम असेल. पुरस्कारासाठी निवडण्यात येणाऱ्या मान्यवर जिल्हाध्यक्षांचे निकष खालीलप्रमाणे असेल.

**१)कोणता जिल्हाध्यक्ष सतत कार्यरत आहे.**

**२)कोणत्या जिल्हाध्यक्षाने आपापल्या तालुक्यातील अधिकांश नियुक्त्या केलेल्या आहेत.**

**३) कोणता जिल्हाध्यक्ष सर्वसामान्य लोकांसाठी अहोरात्र झटत आहे.**

**४) कोणता जिल्हाध्यक्ष संघटनेचे अधिकाधिक कार्यक्रम राबवित आहे.**

**५) कोणत्या जिल्हाध्यक्षांच्या तक्रारी येत नाहीत किंवा अगदी तुरळक येतात.**

**६) कोणता जिल्हाध्यक्ष तळागाळातील चर्मकार बांधवांपर्यंत पोहोचला आहे.**

**७) कोणता जिल्हाध्यक्ष वरिष्ठांना विश्वासात घेतो.**

**८) कोणता जिल्हाध्यक्ष या दोन महिन्यात जास्तीत जास्त सभासद जोडत आहे.**

**९) कोणता जिल्हाध्यक्ष आपल्या जिल्ह्यात सर्वात जास्त प्रमाणात आपली वेबसाईट** www.rcmbg.org **लोकांपर्यंत पोहोचवत आहे.**

### तेव्हा सावधान.....!

आजपासून चर्मकार हृदयसम्राट व क्रांतिकारी नेते मा. श्री. बबनराव (नाना) घोलप आपल्यावर, आपल्या कार्यावर लक्ष ठेवून आहेत. आपल्या बारीक हालचालींची इत्यंभूत माहिती नानांपर्यंत पोहचणार आहे.

निवड झालेल्या एकूण ८ जिल्हाध्यक्षांचा जाहीर सन्मान पुरस्कार देऊन मुंबईतील नियोजित भव्य अशा कार्यक्रमात नानांच्या शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना पुरस्कृत केले जाईल. सदर पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र, सन्मानचिन्ह व प्रत्येकी रु.३०००/- प्रमाणे संयुक्त रक्कम रोख रु. २५,०००/- असेल.

तरी कृपया प्रत्येक जिल्हाध्यक्षाने आपापले कार्य अहवाल दि. ३० नोव्हेंबर २०२० पूर्वी राष्ट्रीय सल्लागार मा. श्री. पंढरीनाथ पवार (९८२०२५८०४९) या क्रमांकावर फोन करून दिलेल्या पत्त्यावर पाठवावे. तसेच अधिक सविस्तर माहितीसाठी राज्य सचिव श्री. दत्तात्रेय गोतिसे यांना (७७२२०७९१२५) या क्रमांकावर संपर्क साधावा. सदर कार्यक्रमाचे आयोजन प्रदेश कार्याध्यक्ष व प्रचार व प्रसार माध्यम मुख्य कॅबिनेट सल्लागार डॉ. शांताराम कारंडे यांनी केले आहे.

# शाळा शिकतो कशाला?

बहूजन समाज स्वतः चे डोके चालवत नाही म्हणून कायम मानसिक गुलामगिरी मध्ये खितपत पडलेला आहे. या व्यवस्थेने भारतात खाऊजा धोरण आणले, खाऊजा म्हणजे खाजगीकरण, ऊदारीकरण, जागतिकीकरण. खाजगीकरणा मध्ये पहिले कशाचे खाजगी करण केले असेल तर ते शाळेचे. खाजगी शाळा सुरु करून शिक्षणाचा काळा बाजार देशात मांडला, स्वतःला विद्वान समजणाऱ्या स्वयंघोषित विद्वानांनी खाऊजा चे फायदे आणि तोटे यावर कधीच चर्चा केली नाही. पहिली पायरी शिक्षणाचे खाजगीकरण करून शिक्षणाचा बाजार शासकीय पैशाने मांडला व सरकारी पैशाने खाजगी शाळांना जगवण्याचे काम सरकारणे स्वतः केले व सरकारी शाळेकडे दुर्लक्ष केले. सरकरी नोकरी बंद करून शिक्षणाचे महत्त्व लोकांच्या मनातून कमी केले. शिकलेला तरुण बेरोजगार फिरताना बघून लोकांनी शिक्षणाला दोष द्यायला सुरवात केली, शिकला पण नोकरी नाही तर शिक्षण काय कामाचे अशी अवस्था या व्यवस्थेने करून ठेवली. परिक्षा न घेता सरसकट पास करण्याच्या निर्णय घेऊन मुलांना अभ्यास करणाचा ताण सरकारने कमी केला, अभ्यास नाही म्हणजे ज्ञान नाही, तर्क नाही, लिखाण वाचन नाही, परिक्षाच नाही म्हणजे शाळेत गेले नाही तरी चालते अशी मानसिकता लोकांची बनवली. हळु हळू शाळेतील सरकारी शाळेत परिक्षा नाही म्हणून थोडेफार पैसे असणाऱ्या लोकांचा कल खाजगी शाळेकडे वळाला, परिक्षा नाही म्हणून विद्यार्थ्यांचे उपस्थिती प्रमाण घटले आणि हेच सरकारला अपेक्षित होते. सरकारी शाळेत विद्यार्थी येत नाही हे कारण सांगुन शाळा बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. **क्रमशः**

लेखक : मारुती रघुनाथ शिवदास सर
कॅबिनेट सल्लागार-प्रचार आणि प्रसार : रा. च. महासंघ
९८८१६६१०५०

# धनंजय मुंडे लिलावती रुग्णालयात दाखल ट्विट करुन दिली माहिती



**मुंबई:**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे सध्या मुंबईतल्या लिलावती रुग्णालयात उपचार घेत आहेत. स्वतः धनंजय मुंडे यांनी ट्विट करुन यासंदर्भातली माहिती दिली आहे. धनंजय मुंडे गेल्या काही दिवसांपासून तीव्र पोटदुखीमुळे त्रस्त आहे. त्यामुळे उपचारासाठी ते रुग्णालयात दाखल झाले आहे.


धनंजय मुंडे यांनी ट्विटमध्ये म्हटलं की, तीव्र पोटदुखीमुळे मागील काही दिवसांपासून मी त्रस्त आहे. त्यामुळे उपचारासाठी आज मुंबईच्या लीलावती हॉस्पिटलमध्ये दाखल झालो आहे. प्रकृती स्थिर असून उपचार घेऊन मी लवकरच पुन्हा आपल्या सेवेत दाखल होईल.

तीव्र पोटदुखीमुळे मागील काही दिवसांपासून मी त्रस्त आहे. त्यामुळे उपचारासाठी आज मुंबईच्या लीलावती हॉस्पिटलमध्ये दाखल झालो आहे. प्रकृती स्थिर असून उपचार घेऊन मी लवकरच पुन्हा आपल्या सेवेत दाखल होईल.

दरम्यान त्यांना लिलावती रुग्णालयातून कधी डिस्चार्ज मिळेल. यासंदर्भातली माहिती अद्याप समोर आलेली नाही.

**धनंजय मुंडेंची कोरोनावरही मात**

जुन महिन्यात धनंजय मुंडे यांना कोरोनाची लागण झाली होती. त्यावेळी त्यांनी मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात कोरोनावर उपचार घेतले होते. १२ जूनला धनजंय मुंडे कोरोना पॉझिटिव्ह असल्याचे समोर आले होते. त्यांना श्वास घेताना त्रास जाणवत होता. त्यामुळे धनंजय मुंडे यांना तातडीने ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर ते १४ दिवस घरातच क्वारंटाईन झाले आणि लगेचच कामात रुजू झाले.

काय ???

अधिकृत आर.सी.एम. ईमासिकाचे
वार्षिक सभासद व्हायचंय?
मग वाट कसली बघताय?
लगेच संपर्क साधा :
आर.सी.एम. प्रचार आणि प्रसार विभाग : ९८२०१५८८८५